
# १८. माझा अनुभव – १


- **ऐका, पाहा व वाचा.**



चंदन, माझा व सुमाचा मित्र आहे. तो आजारी पडला, म्हणून आम्ही त्याला भेटायला निघालो.




आम्ही त्याच्या घरी पोहचलो. आम्ही त्याला फळे दिली. फुले दिली.




''काळजी घे. वेळेवर औषध घे.'' सुमा म्हणाली.



''तू लवकर बरा हो. मग आपण खेळू, मजा करू.'' मी म्हणाले.



चंदन म्हणाला, ''रेहाना, सुमा तुम्हांला भेटून मला आनंद झाला. आता मला बरं वाटतंय.''



चंदनने आमचे आभार मानले. निघताना चंदनचा चेहरा हसरा दिसत होता. हे पाहून आम्हांलाही आनंद झाला.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय दिसते, ते विचारावे. अनुभव-कथनाचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्यावे. चित्रांतील विषयाशी संबंधित अनुभव विद्यार्थ्यांना विचारावे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांवरून अनुभव-तक्ते तयार करावे. वाचून घ्यावे. वर्गात या प्रसंगाचे सादरीकरण करून घ्यावे.

**प्र. १. कोण म्हणाले, ते लिहा.**

(अ) काळजी घे. वेळेवर औषध घे.

(आ) तू लवकर बरा हो.

(इ) आता मला बरं वाटतंय.

**प्र. २. सांगा.**

(अ) चंदनला आनंद का झाला ?

(आ) 'मी' हा शब्द कोणासाठी आला आहे ?

(इ) 'आम्ही' हा शब्द कोणासाठी आला आहे ?

**प्र. ३. तुमचा मित्र/मैत्रीण आजारी पडला/पडली तर तुम्ही काय कराल ?**

**प्र. ४. घटनाक्रमानुसार खालील वाक्यांचा क्रम लावा. वाक्यासमोर क्रमांक लिहा.**

(अ) ''काळजी घे. वेळेवर औषध घे.'' सुमा म्हणाली. ( )

(आ) चंदनने दोघींचे आभार मानले. ( )

(इ) आम्ही त्याला फळे दिली. फुले दिली. ( )

(ई) आम्ही त्याच्या घरी गेलो. ( )

(उ) चंदन, माझा आणि सुमाचा मित्र आहे. ( )

(ई) तो आजारी पडला. ( )

- **पाहा. वाचा. रिकाम्या चेहऱ्यावर भाव दाखवा व लिहा.**

